मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
पुणे, पिंपरी-चिंचवड
बुधवार, दि. 27 नोव्हेंबर 2024 | पान- 1

# पिंपरी-चिंचवडच्या इतिहासातील उच्चांकी मताधिक्य

## शंकर जगताप यांच्या नावे विक्रमाची नोंद : पुनर्रचनेनंतर शहरासाठी होणार पाच मतदारसंघ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील तीनही मतदारसंघासह मावळ विधानसभा मतदारसंघातील विजेत्या उमेदवारांच्या तुलनेत सर्वाधिक मते मिळण्याचा विक्रम चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे विजयी उमेदवार शंकर जगताप यांच्या नावे नोंदला गेला आहे. आतापर्यंतची सर्वाधिक दोन लाख 35 हजार 232 मते घेऊन त्यांनी या उच्चांकी मतांचा पल्ला गाठला आहे.



राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा मतदारसंघ चिंचवड आहे. चिंचवडमध्ये तब्बल 6 लाख 63 हजार 622 मतदार आहेत. राज्यात साधारणत: सरासरी तीन लाख मतदारांचा मिळून एक मतदारसंघ असतो. यंदाच्या निवडणुकीत येथे तीन लाख 87 हजार 520 जणांनी मतदान केले. त्यानुसार, यंदा मतदानाची टक्केवारी 58.39 राहिली.

चिंचवड विधानसभा मतदारसंघात, भाजपाचे शंकर जगताप आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राहुल कलाटे यांच्यात थेट सामना झाला. पहिल्या फेरीपासून ते अखेरच्या 24 व्या फेरीपर्यंत जगताप यांनी मतांची आघाडी कायम राखली. त्यांच्या पारड्यात भरभरून मतदान होत असताना शेवटी त्यांना दोन लाख 35 हजार 232 विक्रमी मते मिळाली. त्यांना मिळालेल्या मतांची टक्केवारी 60.51 टक्के आहे. तर, कलाटे यांना एक लाख 31 हजार 458 मते (33.8 टक्के) मिळाली आहेत.

2009 साली झालेल्या पुनर्रचनेत चिंचवड मतदारसंघाची स्थापना झाली. चिंचवडमधून लक्ष्मण जगताप हे 2009, 2014 आणि 2019 असे सलग तीन वेळा निवडून आले. त्यांना त्यांच्या पहिल्याच निवडणुकीत एक लाख 50 हजार 723 अशी सर्वाधिक मते मिळाली होती. तर, मार्च 2023 च्या पोटनिवडणुकीत अश्विनी जगताप यांना एक लाख 35 हजार 434 मते मिळाली होती. चिंचवड मतदारसंघाच्या आतापर्यंत झालेल्या एकूण पाच निवडणुकामध्ये, शंकर जगताप यांनी विक्रमी मते घेतली आहेत. तर, त्यांचे एक लाख 3 हजार 865 मताधिक्यही मोठे आहे.

जगताप यांच्या मतांचा हा विक्रम पुढील निवडणुकीत कोणी मोडेल, यांची शक्यता कमीच आहे. मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यानंतर पुढील निवडणूक नव्या मतदारसंघात होणार आहे. त्यामुळे इतक्या मोठ्या संख्येने मते कोणा उमेदवाराला मते घेता येणार नाहीत, हे स्पष्ट होत आहे.2026 मध्ये मतदारसंघांची होणार पुनर्रचना दोन वर्षांनंतर, अर्थात 2026 मध्ये देशातील लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना केली जाणार असल्याचे केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे.

या पूर्वी 2009 मध्ये मतदार संघांची पुनर्रचना करण्यात आली होती. दर 25 वर्षांनी मतदार संघाची पुनर्रचना होणे अपेक्षित आहे. प्रत्येकी एक लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघ समाविष्ट असतात. पिंपरी-चिंचवड शहराची वाढती मतदारसंख्या लक्षात घेऊन, तीनऐवजी पाच विधानसभा मतदारसंघ तयार होतील.

मावळ विधानसभा मतदारसंघ धरून पिंपरी-चिंचवडचा स्वतंत्र एक लोकसभा मतदारसंघ तयार होऊ शकतो. लोकसभा मतदारसंघ सरासरी 15 ते 18 लाखांचा असतो. तर, विधानसभा मतदारसंघ हा सरासरी 3 लाख मतदारांचा असतो. येत्या 2029 च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुका नव्या मतदारसंघ पुनर्रचनेनुसार होतील. त्या विधानसभा निवडणुकीत एक लाखाच्या मताधिक्याने कोणी निवडून येईल, याची शक्यता कमी आहे, असे निवडणूक विभागाच्या अधिकार्यांनी सांगितले.

# महापालिका कार्यालयात शुकशुकाट

## अधिकारी, कर्मचारी अद्यापही कामावर रुजू नाहीत

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या कामावर नियुक्तीवर असलेले पिंपरी-चिंचवड महापालिकेचे बहुतांश अधिकारी व कर्मचारी याकाळात व्यस्त होते. निवडणूक संपून आता आचारसंहिताही संपली आहे. मात्र महापालिकेचे हे अधिकारी, कर्मचारी अद्यापही कामावर रूजू झालेले नाहीत. त्यामुळे महापालिका भवन तसेच, क्षेत्रीय कार्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या तुरळक असल्याने शुकशुकाट दिसून येत आहे. गेल्या दीड महिन्यापासून अशी परिस्थिती आहे.

महापालिकेचे तब्बल चार हजार अधिकारी आणि कर्मचारी हे पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक कामासाठी नेमण्यात आले होते. त्यांना निवडणुकीच्या विविध विभागांची जबाबदारी सोपविण्यात आली होती.

निवडणुकीसाठी महापालिकेच्या तब्बल 3 हजार 962 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी काम केले. त्यामध्ये वर्ग दोन व तीनचे दोन हजार 352 अधिकारी व कर्मचारी आहेत. वर्ग चारचे एक हजार 610 कर्मचारी होते.



# कार्तिकी एकादशी निमित्त अलंकापुरीत माउलींचा जयघोष

## नाशिक जिल्ह्यातील शिंपी टाकळी या गावचे लोखंडे दाम्पत्य ठरले महापुजेचे मानकरी

**पुणे | प्रतिनिधी**

कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी सोहळा,कार्तिकी एकादशीची पहाटपूजा पहाटे एक वाजता समाधीवर पवमान अभिषेक व दुधारती अकरा ब्रम्हवृन्दांच्या वेदघोषात संपन्न झाली. यंदा माऊलींच्या पहाटपूजेचा मान हा नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील शिंपी टाकळी या गावच्या लोखंडे या दाम्पत्याला मिळाला.



पहाट पुजेसाठी दर्शन बारी बंद केल्या नंतर दर्शनबारीत असणाऱ्या पहिल्या वारकरी दाम्पत्याला हा मान दिला जातो लोखंडे दाम्पत्य याचे मानकरी ठरले.अशोक मनोहर लोखंडे (वय.५५),अलका अशोक लोखंडे (वय.५२) असं या दाम्पत्याच नाव आहे.रात्री साडे बारा वाजता समाधी दर्शन बंद करण्यात आले.तदनंतर संपूर्ण मंदिर स्वच्छ करण्यात आले.बाराच्या सुमारास पास धारकांना मंदिरात प्रवेश देण्यात आला.

स्वकाम सेवा मंडळ,फिनिक्स ग्लोबल सर्व्हिसेस व इतर स्वयंसेवी संस्थांच्या वतीने मंदिरात स्वच्छता करण्यात आली.रात्री पावणे एक वाजता मुख्य महापुजा व पवमान अभिषेकास सुरुवात झाली माउलींच्या समाधीवर चांदीचा मुखवटा ठेवून पंचामृत अभिषेक करण्यात आला. त्यासाठी दूध, दही, तूप, मध, साखर, आम्रखंड, सुगंधी तेल, उटणे, अत्तर यांचा वापर करण्यात आला. केशरी मेखला, शाल, तुळशीचा हार आणि डोईवर चंदेरी मुकुट ठेवून समाधीला आकर्षक रूप देण्यात आले.

अकरा ब्रह्मवृंदाच्या वतीने रुद्राभिषेक करण्यात आला.दीड वाजता अभिषेक उरकल्या नंतर पूजेचा मान लाभलेल्या लोखंडे दाम्पत्याला दर्शनाचा मान देण्यात आला. पावणे दोन वाजता धुपारती होऊन समाधीचे दर्शन खुले करण्यात आले.

यावेळी खेड तालुक्याचे आमदार बाबाजी काळे, प्रमुख विश्वस्त ॲड.राजेंद्र उमाप, विश्वस्त योगी निरंजननाथ, डॉ.भावार्थ देखणे, प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, बाळासाहेब चोपदार, रामभाऊ चोपदार, आळंदी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भिमाजी नरके,माजी सभापती डी.डी.भोसले पाटील, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर,बाजार समिती संचालक अनुराग जैद,पालिकेचे अधिकारी सचिन गायकवाड,शिवशरण कुमार,शिवसेना शहर प्रमुख राहुल चव्हाण,माजी अध्यक्ष माऊली कड,आशिष गोगावले,माजी नगराध्यक्ष राहुल चिताळकर,माजी उपनगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, आदित्य घुंडरे, सचिन गिलबिले, सागर भोसले, साहेबराव कुऱ्हाडे, प्रदिप बवले, ज्ञानेश्वर रायकर,संदेश तापकीर,अजय तापकीर,माऊलींचे मानकरी योगीराज कुऱ्हाडे, स्वप्नील कुऱ्हाडे, योगेश आरु,मच्छिंद्र शेंडे,प्रशासकीय अधिकारी, आळंदीकर ग्रामस्थ बहुसंख्येनं उपस्थित होते.

# अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग ॲक्शन मोडवर

## पुढील आठवड्यापासून कारवाईला सुरुवात : पीएमआरडीएने पाठवली दहा हजारांहून अधिक बांधकामांना नोटीस

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर पीएमआरडीएचा अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग सक्रिय झाला आहे. त्यानुसार पीएमआरडीएच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामांच्या विरोधात कारवाई सुरू करण्यात येणार आहे. आतापर्यंत सुमारे दहा हजार अनधिकृत बांधकामांना नोटीस दिली आहे. तसेच, पाच ठिकाणी अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासोबतच नऊ तालुक्यातील अनधिकृत होर्डिंगवरही कारवाई करण्यात येणार आहे.



पीएमआरडीए अंतर्गत नऊ तालुक्यातील ८१६ गावांचा समावेश होतो. या गावांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. त्यापैकी सर्वाधिक बांधकामे ही गहुंजे, मारुंजी, हडपसर, वाघोली, तळेगाव या गावामध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामे झालेली आहेत. दरम्यान, प्राधिकरणाकडून नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी पाहणी करून संबंधित बांधकामधारकांना नोटीस दिली आहे.

मात्र तरीदेखील बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आलेले आहे. या अनुषंगाने आता कारवाई करण्यात येणार आहे. महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील मालमत्ताधारकांनी परवानगी घेऊनच आपली बांधकामे करावीत, यासह चालू असलेली अनधिकृत बांधकामे तत्काळ थांबवावीत, असे आवाहन करण्यात येते. मात्र, हे आदेश धुडकावल्याने विविध पाच ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

त्याचप्रमाणे आणखी काही गावांमध्ये येत्या काळात तीन गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. संबंधित पोलीस ठाण्यामध्ये त्याबाबत अर्ज दिला आहे. पोलिसांकडून लवकरच गुन्हा दाखल करण्यात येणार आहे, अशी माहिती महानगर प्राधिकरणातील अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाकडून देण्यात आली.

निवडणुकीचे कामकाज संपल्यानंतर टप्प्या-टप्प्याने अधिकारी पुन्हा येत आहेत. या विभागातील जवळपास निम्म्याहून अधिक स्टाफ निवडणूक कामांमध्ये गुंतला होता. त्यामुळे पुढील आठवड्यापासून कारवाईच्या अनुषंगाने बैठक होणार आहे. त्यानंतर लगेच कारवाई हाती घेण्यात येणार आहे. अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागामध्ये आणखी काही कर्मचारी कंत्राटी म्हणून नेमणूक करणार आहे. तसेच, स्टाफदेखील वाढवण्यात येणार आहे. बांधकाम कारवाईसाठी पोलीस बंदोबस्त मिळत नसल्याने ते थांबले होते. मात्र निवडणुकीनंतर आता बंदोबस्त मिळणे सोपे जाणार आहे.

### हॉटेल्स आणि होर्डिंगवरही होणार कारवाई

**» प्राधिकरणाच्या वतीने हद्दीतील अनधिकृत हॉटेल्स, पब या विरोधात कारवाई सुरू होती. जवळपास पंचवीसपेक्षा अधिक हॉटेलवर कारवाई करण्यात आली होती. मात्र, या ठिकाणाची अधिकाऱ्याची बदली झाल्याने त्यानंतर ती थंडावली होती. तसेच अनधिकृत होर्डिंगवरदेखील कारवाई करण्यात येणार सांगण्यात आले.**

“ निवडणुकीचे कामकाज नुकतेच संपले आहे. त्यानंतर या विभागातील अधिकारी दोन दिवसात कामावर येतील. याबाबत स्वतंत्र बैठक घेण्यात आली असून, महानगर आयुक्तांच्या आदेशानुसार लवकरच पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

**- डॉ. दीप्ती सूर्यवंशी, सह-आयुक्त, अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग.**

# भोईर, ओव्हाळ, भापकर यांचे डिपॉझिट जप्त

## चिंचवड, पिंपरी, भोसरी आणि मावळ मतदारसंघांतून 53 पैकी 45 उमेदवारांची अनामत रक्कम जप्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड, पिंपरी, भोसरी आणि मावळ विधानसभा मतदारसंघांतून निवडणुकीच्या रिंगणातील ५३ उमेदवारांपैकी ४५ जणांची अनामत (डिपॉझिट) जप्त झाली आहे. त्यात अपक्ष उमेदवार तथा माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे बाळासाहेब ओव्हाळ यांच्यासह ४५ जणांचा समावेश आहे.



विधानसभा निवडणुकीत चिंचवडमधून शंकर जगताप, पिंपरीतून अण्णा बनसोडे, भोसरीतून महेश लांडगे, तर मावळातून सुनील शेळके विजयी झाले. दुसऱ्या क्रमांकाची मते चिंचवडमधून राहुल कलाटे, पिंपरीतून सुलक्षणा धर-शिलवंत, भोसरीतील अजित गव्हाणे व मावळमधून अपक्ष बापूसाहेब भेगडे यांना मिळाली. यांची अनामत रक्कम वाचली आहे. निवडणुकीच्या रिंगणातील ५३ जणांपैकी ३५ जणांना मतांचा तीन अंकी आकडाही गाठता आलेला नाही. शहरातील पिंपरी, भोसरी आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघामधील तब्बल ४५ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार निवडणुकीला उभा राहिलेला उमेदवार त्या जागेवर झालेल्या एकूण मतदानापैकी १/६ अर्थात १६.६ टक्के मते घेण्यात अपयशी ठरला, तर त्याने अर्ज करताना जमा केलेली अनामत रक्कम जप्त केली जाते.

अनुसूचित जातीसाठी राखीव पिंपरी मतदारसंघात एकूण १५ उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी १३ उमेदवारांना आपले डिपॉझिट वाचविता आले नाही. पिंपरी मतदारसंघातील मतदारांनी अन्य उमेदवारापेक्षा नोटाला अधिक प्राधान्य दिल्याचे दिसून येत आहे. या मतदारसंघात ४०१३ मतदारांनी नोटाला मत दिले आहे. नोटाला चौथ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत. केवळ तीन उमेदवारांना नोटापेक्षा अधिक मते मिळवता आली आहेत. चिंचवड मतदारसंघात एकूण २१ उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी १९ उमेदवारांना आपले डिपॉझिट वाचविता आले नाही. या मतदारसंघातील ४३१६ मतदारांनी अन्य उमेदवारांपेक्षा नोटाला अधिक प्राधान्य दिल्याचे दिसून येत आहे. या मतदारसंघात देखील नोटाला चौथ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत. केवळ तीन उमेदवारांना नोटापेक्षा अधिक मते मिळवता आली आहेत.

भोसरी मतदारसंघात एकूण ११ उमेदवार रिंगणात होते. विजयी उमेदवार आणि मुख्य प्रतिस्पर्धी उमेदवार वगळता इतर ९ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. अन्य दोन मतदारसंघाच्या तुलनेत भोसरी मतदारसंघात नोटाचा पर्याय खूप कमी मतदारांनी निवडला आहे. २६८५ मतदारांनी नोटाला मत दिले आहे. येथे नोटाला पाचव्या क्रमांकाची मते मिळाली आहेत. केवळ चार उमेदवारांना नोटा पेक्षा अधिक मते मिळवता आली आहेत.

### चिंचवड मतदारसंघ

» भाऊसाहेब भोईर (४३२३) , करण गाडे (३२८८), राजेंद्र गायकवाड (२२७८), रवींद्र परांडे (२६८०), जावेद रशीद शेख (८३८), मारुती भापकर (७७१), राजेंद्र काटे (६६९), राजेंद्र पवार (६१७), सतीश काळे (३३५), रूपेश शिंदे (३०४), सचिन अरुण सिद्धे (३११), मयूर घोडके (२८६), रफिक रशीद कुरेशी (२४१), अतुल समर्थ (२२३), धर्मराज बनसोडे (२०७), अनिल सोनवणे (२०१), विनायक ओव्हाळ (१८८), सिद्धकी शेख (१७६), सचिन सोनकांबळे (१२७)

# दाखले रखडल्याने अर्जदारांची तहसील कार्यालयात धाव

## निवडणूक कामामुळे वाढली तहसीलदारांसमोरील प्रलंबित कामे : ज्येष्ठ नागरिक, महिला ताटकळल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

नागरिकांना शासकीय कामासह शालेय प्रवेशासाठी आवश्यक दाखले वेळेवर मिळत नसल्याने अर्जदारांनी तहसील कार्यालयात सोमवारी धाव घेतली. तहसीलदारांच्या दालनाबाहेर गर्दी झाल्यानंतर अखेर विविध प्रकारचे दाखले पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आले. गेल्या महिनाभरापासून तहसीलदार, नायब तहसीलदार यांना इलेक्शन ड्युटीमुळे शेकडो दाखले प्रलंबित असल्याचे सांगण्यात येत आहे.



पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयांतर्गत उत्पन्न, डोमीसाइल त्याचप्रमाणे विविध दाखल्यांचे वाटप करण्यात येते. त्याचप्रमाणे सातबारा, विविध प्रकारच्या सुनावणी आणि योजनांचा परतावाही अर्जदारांना मिळाला नव्हता. दरम्यान, गृह प्रकल्पासाठी लागणारा उत्पन्न दाखला, डोमीसाइल सर्टिफिकेट यासह विविध प्रमाणपत्रे देण्यात येतात. मात्र, गेल्या महिन्याभरापासून तहसीलदार निवडणुकीच्या कामामुळे व्यस्त असल्याने हे दाखले रखडले होते. त्याचप्रमाणे इतर दाखल्यांची संख्या देखील वाढली होती. नागरिक यासाठी हेलपाटे मारत होते. मात्र, निवडणुकीचे कारण त्यांना दिले जात होते.

दरम्यान, सोमवारी (दि.२५ )सकाळीच विविध दाखले मिळावेत यासाठी, नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. तहसीलदार यांच्या दालनासमोरच नागरिक येऊन थांबले होते. त्यानंतर नायब तहसीलदार यांची भेट घेऊन दाखले देण्यात यावेत, अशी मागणी काही नागरिकांनी केली. त्यानंतर नायब तहसीलदार स्वतः बाहेर आले आणि त्यांनी नागरिकांना दोन ते तीन दिवसांमध्ये दाखले देण्यात येतील, असे सांगितले. त्यानंतर गर्दी काही प्रमाणात कमी झाली. दररोज जवळपास दीडशे ते दोनशे विविध प्रकारचे अर्ज येतात. गेल्या महिन्याभरापासून हे दाखले रखडल्याने तो आकडा जवळपास हजारांच्या घरात गेला असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याचबरोबर नागरिकांच्या विविध तंट्यातील सुनावण्या, सातबारे आणि महसूल संदर्भातील कामे देखील रखडली होती. त्यामुळे तहसील कार्यालय दिवसभर नागरिकांची गर्दी दिसून आली. याचबरोबर संजय गांधी, श्रावणबाळ अशा विविध योजनांसाठी नागरिक आले होते. या ठिकाणी असलेले अधिकारी कर्मचारी निवडणूक कामासाठी गेले होते. ते पुन्हा आल्यानंतर अर्जाची माहिती घेण्यासाठी नागरिक येत होते. आळंदी यात्रेनिमित्त नियोजन आणि विविध प्रकारच्या सुरक्षितेसाठी जिल्हाधिकाऱ्याकडून महसूल अधिकाऱ्यांना कामे सोपवण्यात आली आहेत. त्यासाठी या कार्यालयातील अधिकारी तिथे जाऊ शकतात. त्यामुळे मंगळवारीही नागरिकांना अधिकारी भेटू शकणार नाहीत. त्यामुळे दाखल्यास इतर कामे आणखी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### शिधापत्रिका कार्यालय रिकामे

» शिधापत्रिकेतील नागरिकांची प्रलंबित कामे आणि धान्य मिळत नसल्याच्या तक्रारीबाबत नागरिक आले होते. मात्र, निगडी येथील शिधापत्रिका कार्यालयामध्ये केवळ दोनच कर्मचारी उपलब्ध होते. अन्य अधिकारी निवडणुकीच्या कामांमध्ये असल्याचे सांगण्यात आले. त्याचप्रमाणे कर्मचारी देखील दरवाजाला कडी लावून आत बसले होते. त्यामुळे बाहेर ताटकळत थांबलेले नागरिक कोणी उत्तर देत नसल्याने निघून गेले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इच्छुकांचा उत्साह दुणावला!

## सध्याच्या पोषक स्थितीचा अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला फायदा होईल अशी बारामतीत स्थिती

**पुणे | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीतून विधानसभेला मोठा विजय मिळविल्याने आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी इच्छुकांचा उत्साह दुणावला आहे. या निवडणुका लवकर झाल्या तर सध्याच्या पोषक स्थितीचा अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला फायदा होईल अशी स्थिती सध्या बारामतीत आहे.



बारामती नगरपरिषद, माळेगाव नगरपंचायत तसेच जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका गेली काही वर्षे रखडल्या आहेत. प्रशासकांच्या हाती कारभार गेला आहे. आरक्षणाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने या निवडणुका होत नाहीत.

परंतु आता लोकसभा, विधानसभा निवडणुका पार पडल्या आहेत. केंद्रात एनडीए, तर राज्यात महायुतीची सत्ता आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून आरक्षणाच्या प्रश्न निकाली निघाला तर या निवडणुका फेब्रूवारी, मार्चमध्ये होतील अशी चर्चा सध्या आहे.

लोकसभेला बारामतीतून खासदार सुप्रिया सुळे यांना 48 हजारांचे मताधिक्य मिळाले होते. त्यामुळे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना ऊर्जा मिळाली होती. पक्षात नव्याने दाखल होणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्याही वाढत चालली होती. त्याला अजित पवार यांच्या विधानसभेच्या मोठ्या विजयाने आता ब्रेक लागला आहे. अजित पवार यांनी लाखाहून अधिक मताधिक्य घेतल्याने आणि सत्तेत ते सहभागी होणार असल्याने साहजिकच सत्तेच्या बाजूने इच्छुकांची संख्या अधिक असणार आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटानेही यापूर्वीच ग्रामपंचायत ते लोकसभा या सगळ्या निवडणुका आम्ही लढवू असे जाहीर केले आहे. त्यामुळे अजित पवार गटाकडे विचार न झाल्यास नाराज मंडळी लागलीच या गटाकडून तिकीट मिळवू शकतात. जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी हे प्रमाण कमी राहिल,परंतु बारामती नगरपरिषद आणि माळेगाव नगरपंचायतीचा विचार केल्यास इच्छुक इकडून तिकडे उड्या मारतील हे निश्चित.

### आघाडी-महायुतीवर गणिते

» लोकसभा, विधानसभेच्या निवडणुका आघाडी आणि महायुतीने एकत्र येऊन लढल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत अद्याप या दोन्हींकडून कोणतीही भूमिका जाहीर झालेली नाही. या निवडणुका स्वतंत्रपणे लढल्या गेल्यास उमेदवारांची संख्या वाढेल, त्याचा फटका कोणाला बसेल, हे आत्ता तरी सांगणे अशक्य आहे.

अजित पवार यांचा विजय दमदार असला तरी नगरपरिषद निवडणुकीत बारामतीत तिकीट देताना त्यांची दमछाक होणार आहे. इथे 44 जागा आहेत. इच्छुकांची संख्या 300 च्या घरात आहे. त्यामुळे नाराजांना ते कसे थोपवतात, यावर सगळी गणिते आहेत. या उलट शरद पवार गटाकडे इच्छुकांची संख्या मर्यादित राहिल. परंतु समोरील गटातील नाराजांकडे त्यांची नजर असेल.

जिल्हा परिषदेचे 6 गट आणि पंचायत समितीचे 12 गण तालुक्यात आहेत. नगरपरिषद, नगरपंचायतीच्या तुलनेत जिल्हा परिषद, पंचायत समितीला अशा उड्या मारणे इच्छुकांसाठी आत्मघात असेल. त्यामुळे या निवडणुकीत तो प्रश्न फारसा येणार नाही.

**बारामतीत केवळ 3 केंद्रांवर मविआला आघाडी**

बारामती तालुक्यातील 386 मतदान केंद्रांपैकी फक्त 3 केंद्रांवर मविआचे उमेदवार युगेंद्र पवार यांना आघाडी मिळाली. अन्य 383 केंद्रांवर महायुतीचे उमेदवार अजित पवार यांना आघाडी मिळालेली आहे.

# सिंहगड, पानशेतमध्ये मोकाट कुत्र्यांची दहशत

## हल्ल्यांत वन्यजीवांसह पाळीव प्राण्यांचे बळी : बंदोबस्त करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

सिंहगड, पानशेत परिसरात भटक्या व मोकाट कुत्र्यांची दहशत वाढली आहे. या कुत्र्यांच्या हल्ल्यांत ससे, मोर, हरीण आदी वन्यजीवांसह शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या आदी पाळीव प्राण्यांचे बळी जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये दहशत पसरली आहे.



मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे सिंहगड पानशेतच्या जंगलातील दुर्मीळ वन्यजीवांचे बळी जात आहेत. रानात चरण्यासाठी सोडलेल्या शेळ्या, मेंढ्या, वासरे तसेच शेडमधील शेळ्या, पोल्ट्री फार्ममधील कोंबड्यांचा रातोरात फडशा पाडून मोकाट कुत्री जंगलात पसार होत आहेत. पुणे-पानशेत रस्त्यासह सिंहगड व धरण खोऱ्यातील ओढे, नाले, जंगलात येथील हॉटेल, ढाबे, रिसॉर्ट, चिकन-मटण दुकानदार शिळे अन्नपदार्थ, तसेच सडलेले मांस प्लास्टिकच्या पिशव्यांत भरून फेकत आहेत. त्यामुळे या भागात मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली आहे.

खानापूर, थोपटेवाडी, डोणजे, मणेरवाडी, ओसाडे, निगडे मोसे, आंबी, रुळे, कादवे, कुरण खुर्द-बुद्रुक, पानशेत येथील जंगलात दुर्मीळ वन्यजीवांसह रानडुकरे, मोर, लांडोर, ससे, भेकरे, सायाळ, रानकोंबडे आदींचा अधिवास आहे. मात्र, मोकाट कुत्री आता या वन्यजीवांसाठी धोकादायक बनली आहेत.

### वन विभाग व ग्रामपंचायतीची टोलवाटोलवी

» ग्रामपंचायतीने मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, असे सिंहगड, पानशेत वन विभागाने स्पष्ट केले आहे. आमच्याकडे कुत्र्यांच्या बंदोबस्त करण्याची यंत्रणा नाही, असे ग्रामपंचायत प्रशासनाचे म्हणणे आहे. वन विभाग व ग्रामपंचायतीच्या टोलवाटोलवीमुळे गोरगरीब शेतकरी मात्र चिंताग्रस्त झाले आहेत. वन्यजीवांचे बळी जाऊनही वन विभाग सुस्तावला असल्याचे गंभीर चित्र पुढे आले आहे.

आंबी (ता. हवेली) येथील शेडमध्ये शिरून मोकाट कुत्र्यांनी 50 हून अधिक शेळ्यांचा फडशा पाडला आहे. शेतकरी शंकरराव निवंगुणे म्हणाले, मोकाट शिकारी कुत्री कळपाने फिरत आहेत. शेळ्या, मेंढ्या, वासरे यांच्यावरही कुत्रे माणसांसमोर हल्ला करत आहेत. प्रतिकार केला असता ते माणसांवरही हल्ला करीत आहेत. शेतकरी दत्ता रामचंद्र निवंगुणे यांच्या 17 शेळ्या, मेंढ्या व एक वासरू अशा 18 जनावरांचा एकाच रात्रीत मोकाट कुत्र्यांनी फडशा पाडला आहे. भटक्या कुत्र्यांची नसबंदी करण्यात यावी. तसेच, ही कुत्री पकडून न्यावीत, अशी मागणी आंबीच्या माजी सरपंच मंगल लहू निवंगुणे यांनी केली आहे.